महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैंनिक

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर

मुख्य संपादक : रवींद्र घोडविंदे

Rs.2/-

कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम.डी.)

गुरुवार ■ १५ मे २०२५ ■ वर्ष - सहावे ■ अंक ३१६ ■ RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Reg. No. THC/256/2022-2024

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पत्रकार हवे आहेत

दैंनिक ठाणे जीवनदीप वार्ता करिता खालील ठिकाणी पत्रकार नियुक्त करणे आहे. इच्छुकांनी संपर्क करावा

• मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर • बोईसर • वसई • विरार • भाईंदर • पनवेल • वाडा • बदलापूर • शहापूर • आसनगाव • भिवंडी • कसारा • कर्जत • सरळगाव • म्हसा • धसई • अंबरनाथ • विठ्ठलवाडी • उल्हासनगर • टिटवाळा • शहाड • कोनगाव • आंबिवली • दिवा • कळवा

दैनिक 'ठाणे जीवनदीप वार्ता'
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.)
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८/९०८२६ ६४७८१
E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com

# 'ऑपरेशन सिंदूर'च्या यशानंतर
# भारतीय सेनेच्या सन्मानार्थ मुंबईत तिरंगा यात्रा



**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**मुंबई :** जम्मू काश्मीरच्या पहलगाममधील दहशतवादी हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर च्या माध्यमातून जोरदार प्रत्युत्तर दिलं. भारताने 'ऑपरेशन सिंदूर' राबवत पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमध्ये तब्बल ९ ठिकाणी असलेल्या दहशतवादी तळांना उद्ध्वस्त केलं. तसेच त्यानंतर पाकिस्तानकडून भारताच्या सीमेवर होणाऱ्या ड्रोन हल्ल्याला देखील भारताने चोख प्रत्युत्तर दिलं.

**'सुन ले बेटा पाकिस्तान, बाप तेरा हिंदुस्तान अशी घोषणाबाजी करत देवेंद्र फडणवीस म्हणाले की, "आज तिरंगा रॅलीच्या माध्यमातून आपल्या देशातील सैन्यांचे आभार व्यक्त करण्यासाठी आपण या ठिकाणी एकत्र आलो आहोत. भारतीय सैन्यांची ताकद काय आहे हे ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून दाखवून दिलं. हमें कोई झुका नहीं सकता, हम ना झुकेंगे ना रुकेंगे ना बिकेंगे ना थकेंगे, अशा प्रकारची भारतीय सेनेची ताकद ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून सर्वांना कळली असेल", असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.**

दरम्यान, भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदूर राबवत पाकिस्तानला दिलेल्या जोरदार प्रत्युत्तराच्या पार्श्वभूमीवर सर्वत्र भारतीय सैन्यांचं कौतुक करण्यात येत आहे. या अनुषंगानेच आज मुंबईत भाजपाच्यावतीने तिरंगा रॅली काढण्यात आली होती. या तिरंगा रॅलीत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संबोधित करताना भारतीय जवानांचं कौतुक करत




ऑपरेशन सिंदूरबाबत भाष्य केलं. भारत झुकणार नाही हे ऑपरेशन सिंदूरने दाखवलं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

"दहशतवाद्यांनी पहलगाममध्ये २७ जणांना ज्या पद्धतीने मारलं, धर्म विचारून मारलं, पत्नीसमोर त्रपतीला मारलं, मुलासमोर वडिलांना मारलं. अशा प्रकारचं हत्याकांड भारताच्या नाही तर जगाच्या इतिहासात आपल्याला कधी पाहायाला मिळालं नव्हंत. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील जशास तसं प्रत्युत्तर देणारं असं सागितलं होतं. त्यानंतर भारतीय सैन्यांनी ऑपरेशन सिंदूर राबवलं आणि जोरदार प्रत्युत्तर दिलं, असं देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं.

"आमच्या बहिणींचं कुंकू पुसण्याचं काम केलं त्यांना ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून धडा शिकवला. भारतीय सैन्यांनी पाकिस्तानात घूसून दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले. भारताने ज्या ९ ठिकाणी दहशतवाद्यांचे अड्डे उद्ध्वस्त केले, त्या ठिकाणी भारतीय सेना कधीच पोहचणार नाही असं पाकिस्तानला वाटायचं. मात्र, तेथेच जाऊन भारतीय सैन्यांनी दहशतवाद्यांचा खात्मा केला. तसेच पाकिस्तानला हे दाखवून दिलं की दहशतवादी कुठेही लपले तरी आम्ही सोडणार नाही", असंही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

थोडक्यात महत्वाचे

## सायबर हल्ल्यात बदलापूर पालिकेची वेबसाईट हॅक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**बदलापूर :** भारत पाकिस्तानदरम्यान निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीत भारतातील विविध शासकीय संस्था, कार्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संकेतस्थळांवर तब्बल १५ लाख सायबर हल्ले झाल्याचे समोर आले होते. यात ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिका प्रशासनाचाही समावेश असल्याची कबूल राज्याच्या सायबर गुन्हे विभागाने दिली आहे. त्यामुळे सध्या पालिकेचे संकेतस्थळ बंद ठेवण्यात आले आहे. पालिका प्रशासनाने संकेतस्थळावरील माहिती सुरक्षीत असल्याची माहिती दिली आहे. पहलगाम हल्ल्याच्या नंतर पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर भारताच्या वतीने हल्ले करण्यात आले. त्या युद्धकाळात समाज माध्यमे, माध्यमे आणि इतर माध्यमातूनही वेगळया प्रकारचे युद्ध छेडले जात होते. यात सायबर हल्ल्याचाही समावेश होता. या काळात भारतातील विविध शासकीय संस्था, कार्यालये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या संकेतस्थळावरही सायबर हल्ले करण्यात आले. या काळात तब्बल १५ लाख सायबर हल्ले झाल्याची माहिती पुढे आहे. यात पाकिस्तानासह बांगलादेश, इंडोनेशिया या भागातून हे हल्ले झाले. दोन्ही देशांचे शस्त्रसंधीवर एकमत झाल्यानंतर या हल्ल्यांचे प्रमाण घटले. मात्र तोपर्यंत अनेक संकेतस्थळे हॅक झाली होती.

## भाजपा भिवंडी शहर जिल्हाध्यक्षपदी रवी सावंत

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी, ता. १४ (वार्ताहर)** भारतीय जनता पार्टी भिवंडी शहर जिल्हा अध्यक्षपदी रवी सावंत यांची निवड करण्यात आली आहे. २००६ पासून भाजपमध्ये असलेले रवी सावंत हे आमदार महेश चौघुले यांचे खंदे समर्थक आहेत. भाजप युवा मोर्चा शहराध्यक्षपदाची सलग दोन वेळा तर शहर जिल्हा महासचिव म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळलेली आहे. तर विद्यमान अध्यक्षांसोबत शहर जिल्हा उपाध्यक्ष म्हणून काम केले आहे. रवी सावंत यांच्या शहर जिल्हा अध्यक्षपदाच्या निवडीनंतर आमदार महेश चौगुले शहर जिल्हाध्यक्ष ॲड. हर्षल पाटील यांच्यासोबतच पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी रवी सावंत यांचे अभिनंदन केले. पक्षाने दिलेली संधी छोट्या कार्यकर्त्यासाठी मोठी संधी असून पालिका निवडणुका एकहाती जिंकण्यासाठी प्रयत्नशील असल्याचे म्हणाले.

# जिल्ह्यातील पहिल्या मेट्रोची ट्रायल यशस्वी
## मिरा-भाईंदर मेट्रो : ठाणे जिल्ह्याचा बदल घडवणारा प्रकल्प

**दै. ठाणे जीवनदीप वार्ता**

**ठाणे, दि.14 :** मुंबई महानगर प्रदेशासाठी एक ऐतिहासिक क्षण ठरलेल्या आजच्या दिवशी, मेट्रो लाईन-9 च्या पहिल्या टप्प्याच्या ट्रायल रनला औपचारिकपणे सुरुवात झाली. या निमित्ताने ठाणे जिल्ह्यातील पहिली मेट्रो सेवा कार्यान्वित होण्याच्या दिशेने आज महत्वाचं पाऊल उचललं गेलं. मेट्रोच्या या ऐतिहासिक क्षणाची सुरुवात मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा प्राधिकरणाचे अध्यक्ष, श्री. एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री श्री.अजित पवार यांच्या हस्ते पार पडली. यावेळी मेट्रोची तांत्रिक पाहणीही करण्यात आली.



या कार्यक्रमास परिवहन मंत्री श्री.प्रताप सरनाईक, विधान परिषदेचे सदस्य श्री. निरंजन डावखरे, आमदार श्री.नरेंद्र मेहता, आमदार सौ. मनिषा चौधरी, आणि माजी खासदार श्री.गोपाल शेट्टी या मान्यवरांसह एमएमआरडीए महानगर आयुक्त डॉ. संजय मुखर्जी,अतिरिक्त महानगर आयुक्त-१, श्री.विक्रम कुमार, एमएमआरडीए च्या व्यवस्थापकीय संचालक, एमएमएमओसीएल

सौ.रूबल अग्रवाल आणि मीरा भाईंदर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक श्री.राधाबिनोद शर्मा, अपर जिल्हाधिकारी हरिश्चंद्र पाटील, मीरा-भाईंदर पोलीस आयुक्त मधुकर पांडे, सहायुक्त दत्ता शिंदे, प्रांताधिकारी उर्मिला पाटील, तहसिलदार निलेश गौड व अन्य अधिकारीही उपस्थित होते.

**मेट्रो लाईन-9: ठाणे जिल्ह्याचा बदल घडवणारा प्रकल्प:**

मुंबईत पहिल्यांदाच अशा प्रकारचा डबल डेकर प्रकल्प उभारण्यात आला आहे, जिथे मेट्रो आणि उड्डाणपूल एकाच संरचनेत आहेत. मेट्रो लाईन-9 चा पहिला टप्पा हा दहिसर (पूर्व) ते काशिगावपर्यंत ४.४ किमी लांबीच असून या मार्गावर चार स्थानके आहेत - दहिसर (पूर्व), पांडुरंगवाडी, मिरागाव आणि काशिगाव.

**जोडणीचे नवे दालन**

या मेट्रोमुळे मिरा-भाईंदरकरांसाठी मुंबईच्या विविध कोपऱ्यांपर्यंत पोहोचणं अधिक सोयीचं आणि वेगवान होणार आहे: CSMIA आंतरराष्ट्रीय विमानतळाशी लाइन द्वारे थेट जोडणी मिरा गाव मेट्रोस्टेशन मार्गे मेट्रो लाईन 10 व्दारे भविष्यात ठोण्याला जोडणे

**अपेक्षित फायदे:**

दहिसर टोल नाका परिसरातील वाहतूक कोंडी लक्षणीयरीत्या कमी होईल, प्रदूषण आणि ध्वनी प्रदूषणात लक्षणीय घट ऊर्जा बचतीसाठी 'रिजेनेरेटिव्ह ब्रेकिंग' तंत्रज्ञान पर्यावरणपूरक बांधकाम पद्धतींचा वापर सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास अधिक आरामदायक आणि वेळेत होणार



# माळशेज घाटात नव्या रिसॉर्टची उभारणी
## आमदार किसन कथोरे यांची एमटीडीसीच्या व्यवस्थापकीय संचालकांसोबत बैठक

दै. ठाणे जीवनदीप वार्ता :

**मुंबई :** मुरबाड विधानसभा मतदार संघाचे आमदार किसन कथोरे यांची माळशेज घाट येथील महाराष्ट्र राज्य पर्यटन विकास महामंडळाच्या ठिकाणी नवीन रिसॉर्ट बांधण्याबाबत महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी यांच्या समवेत बैठक झाली. यावेळी सविस्तर चर्चा करून आवश्यक सूचना आणि सुधारणा करण्यात याव्यात असे सुचवत माळशेज घाटातील पर्यटन विकास महामंडळाचे नवीन रिसॉर्ट अद्ययावत सोयी सुविधायुक्त असावे, जेणेकरून पर्यकांनासाठी सुलभ आणि आकर्षक ठरेल. त्यामुळे पर्यटन वृद्धीसाठीही चालना मिळेल असे कथोरे यांनी सांगितले. याप्रसंगी एमटीडीसीचे व्यवस्थापकीय संचालक मनोजकुमार सूर्यवंशी, एमटीडीसीचे अधीक्षक अभियंता बोरसे, वास्तू विशारद समीर धुर्वे, अतुल कुरतडकर, सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता सत्यनारायण कांबळे, उपवनसंरक्षक, रेपाळे साहेब, वनक्षेत्रपाल राजवर्धन भोसले व इतर सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.



**आ. निरंजन डावखरे यांनी भाजपा ठाणे शहरचे नवनियुक्त जिल्हाध्यक्ष संदीप लेले यांची सदिच्छा भेट घेऊन त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.**









# मधुमेहावर आयुर्वेदाची साखरमुक्त वाटचाल



आजच्या तणावयुक्त, गतिमान आणि असंयमित जीवनशैलीमुळे मधुमेह (डायबेटीस) हा आजार जागतिक आरोग्याच्या मोठ्या समस्यांपैकी एक ठरला आहे. आधुनिक वैद्यकशास्त्रात मधुमेह हा रक्तातील साखरेचे प्रमाण वाढल्याने होणारा आजार मानला जातो, पण आयुर्वेद या प्राचीन भारतीय आरोग्यशास्त्रात मधुमेहाची मुळं शरीराच्या दोषधातूंच्या असंतुलनात मानली आहेत. आयुर्वेदात मधुमेह "प्रमेह" या संज्ञेखाली मोडतो, जो मूत्राशी संबंधित विकारांचा समूह आहे. प्रमेहाचे एकोणवीस प्रकार वर्णन केले आहेत, आणि त्यात मधुमेह हा कफप्रधान, जड आणि जटिल प्रकार आहे, ज्यामध्ये मूत्र मधुर, पातळ व वारंवार येते.

### मधुमेह म्हणजे काय?

"मधु" म्हणजे साखर आणि "मेह" म्हणजे वारंवार मूत्रविसर्जन होणे. मधुमेह या विकारात रुग्णाचे मूत्र गोडसर, चिकट आणि अधिक प्रमाणात येते. रुग्ण थकवा, वजन कमी होणे, वारंवार भूक व तहान लागणे, दृष्टिदोष, चटका जाणवणे, त्वचेवर जखमा न होणे, जनेंद्रियाभोवती खाज किंवा दाह या लक्षणांनी त्रस्त असतो.

### मधुमेहाचे प्रकार (Types):

आयुर्वेदानुसार मधुमेह हा प्रमेहाचा एक प्रकार आहे. प्रमेहाचे ३ दोषानुसार वर्गीकरण केले गेले आहे –

1. कफज प्रमेह – सुरुवातीचा, हलका प्रकार
2. पित्तज प्रमेह – मध्यम तीव्रतेचा
3. वातज प्रमेह – अवहेलना केल्यास निर्माण होणारा, जड व जटिल प्रकार म्हणजेच मधुमेह

वातप्रधान मधुमेह सामान्यतः अनुवंशिक आणि कृश प्रकृतीच्या व्यक्तींमध्ये अधिक दिसतो.

### कारणे (Causes of Madhumeha) :

मधुमेहाची मुळे चुकीच्या आहार-विहारात आहेत. अति गोड, स्निग्ध, तूपयुक्त, जड अन्न, सतत खाण्याची सवय, दिवसा झोप, शारीरिक श्रमाचा अभाव, मानसिक ताणतणाव, अति आरामप्रिय जीवनशैली, तसेच अनुवांशिकता या गोष्टींचा दुष्परिणाम म्हणून दोषांची आणि धातूंची विकृती होते. कफ आणि मेदधातू वाढले जातात, शरीरातील जठराग्नी मंदावतो आणि अपचित दोष मूत्रमार्गातून बाहेर पडू लागतात. यामुळे मधुमेह निर्माण होतो.

### गंभीर परिणाम (Complications) :

आधी लक्ष न दिल्यास मधुमेह अनेक अंगांवर विपरीत परिणाम करू शकतो – डोळ्यांवर परिणाम होऊन दृष्टिदोष, मूत्रपिंड निकामी होणे (kidney failure), तंत्रिका शिथिलता (neuropathy), पायांमध्ये जखमा न भरणे, हृदयरोग आणि लैंगिक दुर्बलता यासारख्या समस्या उद्भवू शकतात.

### आयुर्वेदिक उपचार (Ayurvedic Cure) :

आयुर्वेदात मधुमेहावर शोधन आणि शमन असे दोन स्तरांवर उपचार केले जातात. शोधन म्हणजे पंचकर्माद्वारे शरीरशुद्धी – विशेषतः बस्ती आणि विरेचन यांचा उपयोग केला जातो. यानंतर शमन म्हणजे औषधींचा वापर केला जातो. मधुमेहासाठी गुणकारी औषधी म्हणजे – गुडमार, जांबूळ बी, मेथी, कटकारी, त्रिकटु, शिलाजीत, अभया, अमृता (गिलोय), वसंतकुसुमाकर रस इत्यादी. या औषधांचा उपयोग दोषप्रमाणे व प्रकृतीनुसार करावा.



-डॉ. प्रतिक्षा रविंद्र घोडविंदे
M.D, B.A.M.S
(Ayurveda)

### योग व व्यायाम:

नित्यनेमाने व्यायाम, प्राणायाम आणि योगासने केल्याने मधुमेह नियंत्रणात राहतो. विशेषतः कपालभाती, भस्त्रिका, anulom-vilom हे प्राणायाम, आणि वज्रासन, पवनमुक्तासन, धनुरासन, अर्धमत्स्येन्द्रासन ही योगासने अत्यंत उपयुक्त ठरतात. दिवसा झोपणे, जास्त आळस करणे आणि अति ताण घेणे यापासून दूर राहावे.

### आहारशुद्धी (Dietary Management):

मधुमेही रुग्णाने रुक्ष, हलका व पचण्यास सुलभ आहार घ्यावा. गहू, ज्वारी, नाचणी यासारखी धान्ये, पालेभाज्या, कारले, परवल, कोथिंबीर, आवळा, काकडी, गाजर यांचा समावेश करावा. साखर, मैदा, बटाटे, केळी, तळलेले पदार्थ, आइसक्रीम, पेस्ट्री, अल्कोहोल, कोल्ड ड्रिंक्स हे पदार्थ टाळावेत. दररोज कोमट पाण्याचे सेवन व वेळेवर जेवण आवश्यक आहे.

### जीवनशैलीतील बदल (Lifestyle Changes):

सकाळी लवकर उठणे, नियमित दिनचर्या पाळणे, आठवड्यातून एक उपवास ठेवणे, तणाव टाळणे, ध्यानधारणा, योग्य झोप आणि सतत चालणे – हे सर्व मधुमेहावर प्रभावी उपाय आहेत. मनाची शांतता राखणे आणि अति चिंता टाळणे हे उपचाराचे महत्त्वाचे भाग आहेत.

### निष्कर्ष:

मधुमेह हा फक्त रक्तातील साखरेच्या वाढीपुरता मर्यादित नसून तो शरीरातील दोष व धातूंच्या असंतुलनामुळे होणारा संपूर्ण शारीरिक आणि मानसिक विकार आहे. आधुनिक औषधे फक्त रक्तातील साखर नियंत्रणात ठेवतात, पण आयुर्वेद त्याच्या मुळाशी जाऊन संपूर्ण शरीराच्या शुद्धीवर भर देतो. योग्य आहार, औषधी, योग आणि जीवनशैली यांच्या संतुलनाने मधुमेहावर प्रभावी नियंत्रण शक्य आहे. आयुर्वेद आपल्याला फक्त रोगनिवारण नव्हे तर आरोग्यमाय जीवनशैली शिकवतो – आणि हीच मधुमेहावरील खरी "साखरमुक्त वाटचाल" आहे.

॥जय आयुर्वेद ॥ ॥जय धन्वंतरी॥



रामायु पंचकर्म हॉस्पिटल ॲण्ड वेलनेस सेंटर
साईबाबा रोड, महागणपती मंदिराजवळ टिटवाळा (पुर्व) संपर्क : 9920377799
ई-मेल: ramayupanchakarma@gmail.com
वेळा: सकाळी 10 ते संध्या. 7
(रविवार - आवश्यकतेनुसार खुले)

# मुरबाड नगरपंचायतसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी शिवसैनिकांनी कामाला लागावे –जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुरबाड(बाळासाहेब भालेराव) : मुरबाड तालुक्यातील होऊ घातलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका संदर्भात आज शिवसेना पक्षाचे कल्याण - मुरबाड जिल्हा प्रमुख अरविंद मोरे यांच्या नेतृत्वाखाली बैठकीचे आयोजन मुरबाड येथील शासकीय विश्रामगृह येथे पार पडले, या बैठकीत आगामी काळात होणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूका संदर्भात विचारविनिमय करण्यात आले, तसेच मुरबाड शहरातील पुढे होणाऱ्या नगरपंचायत निवडणुकीसाठी १७ प्रभाग मध्ये शाखाप्रमुख यांची तात्काळ नियुक्त्या करा व सर्वांनी कामाला लागा कोणत्याही परिस्थितीत नगरपंचायतवर भगवा फडकण्यासाठी सर्वांनी एक दिलाने काम कराशिवसेनेचे प्रमुख महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा ठाणे जिल्ह्याचे पालकमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून विविध कार्यकर्त्यांचा प्रवेश सुरू आहे भविष्यामध्ये अधिक प्रमाणामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये प्रवेश होणार आहेत असे देखील जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी सांगितले. तसेच आगामी निवडणूका शिवसेना स्वबळावर ही लढू शकते का याची चाचपणी करण्याचे आदेश जिल्हाप्रमुख अरविंद मोरे यांनी दिले आहेत, या बैठकीत तालुका शिवसेनेच्या बाबतीत आढावा घेण्यात आला तसेच, मुरबाड नगरपंचायत उपनगराध्यक्ष निवडणूकितील पराभवा बाबत ही आत्मचिंतन करण्यात आले,या बैठकी करिता जिल्हाप्रमुख अरविंद मोरे,तालुका प्रमुख कांतीलाल कंटे, तालुका समन्वयक आप्पाउपजिल्हाप्रमुख संजय भानुशाली, यशवंतराव, माजी तालुका प्रमुख संतोष जाधव, सरपंच राम सासे, तालुका सचिव महेश भांगे, विभाग प्रमुख दत्ता शिंगोळे, भरत गायकर, एकनाथ व्यपारी,संतोष दळवी, मिलिंद घरत, बबलू बहडकर, बाळकृष्ण म्हारसे, भाऊ यसवंतराव या सह प्रमुख पदाधिकारी उपस्थित होते.



# मराठी साहित्य मंडळ पेण तर्फे ज्येष्ठांना 'आधारवड' सन्मान प्रदान



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
पेण : 'मराठी साहित्य मंडळ पेण' संस्थेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून खालील ज्येष्ठ सभासदांचा नागरिकांचा सन्मान जागतिक मातृदिनी करण्यात आला. मराठी साहित्य मंडळाच्या विविध उपक्रमांत नेहमीच 'एक हात मदतीचा' संस्थेस देणाऱ्या जेष्ठ लेखक कवी आणि अनेक संस्थांच्या विविध पदांवर कार्यरत राहून मराठी भाषा संवर्धनास हातभार लावणाऱ्या दीनानाथ पाटील ,अध्यक्ष, महात्मा गांधी मंदिर ग्रंथालय पेण अरविंद वनगे आणि मराठी साहित्य मंडळ पेण यांचे माजी अध्यक्ष नारायण सुर्वे यांना त्यांच्या निवास स्थानी जावून सन्मानपत्र,शाल,श्रीफळ देऊन 'आधारवड' म्हणून सन्मानित करण्यात आले. यावेळी मंडळाचे अध्यक्ष डॉ.देवीदास बामणे,उपाध्यक्ष प्रा.सतीश पोरे,सचिव वैभव धनावडे आणि या उपक्रमाचे संकल्पनाकार माजी सचिव बाळकृष्ण कमळकर यांच्या हस्ते सन्मान बहाल करण्यात आला.सदर प्रसंगी कवि दीनानाथ पाटील यांनी जागतिक मातृदिनाचे औचित्य साधून 'आई' विषयावरील कविता भावपूर्णरीत्या सादर केली.अण्णा वनगे आणि नारायण सुर्वे यांनी गत कार्यक्रमांच्या आठवणी जागृत केल्या.

# भुवन गावच्या गार्गी खापरे हिचा दहावीच्या परीक्षेत प्रथम क्रमांक



दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता /मुरबाड : मुरबाड तालुक्यातील भुवन गावची सुकन्या गार्गी खापरे हिने ठाणे येथे दहावीच्या परीक्षेत ९५.८० टक्के गुण मिळवून तिने शाळेत प्रथम क्रमांक पटकावला आहे .

गार्गी खापरे ही उद्योजक हरेश खापरे यांची कन्या आहे. गार्गीचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# हॉली एंजल शाळेचा २१ व्या वर्षी दहावीचा (सीबिएसई) १०० टक्के निकाल

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
डोंबिवली : हॉली एंजल शाळा, डोंबिवलीचा 21 व्या वर्षी इयता दहावी ( सीबिएसई ) 100 टक्के निकाल लागला आहे.एकूण 164 विद्यार्थ्यांपैकी जवळपास 30% विद्यार्थ्यांनी 90% पेक्षा अधिक गुण मिळवले. ज्यातून संस्थेची शैक्षणिक गुणवत्ता, मूल्याधिष्ठित शिक्षणप्रणाली आणि विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाबाबतची बांधिलकी दिसून येते. विशेष कौतुकास्पद बाब म्हणजे इंग्रजी, गणित आणि विज्ञान या विषयांत विद्यार्थ्यांनी 100 पैकी 100 गुण मिळवले, हे त्यांच्या अभ्यासातील सातत्य व शिक्षकांच्या अथक मार्गदर्शनाचे फलित आहे.



या सातत्यपूर्ण शैक्षणिक यशामागे संस्थेचे संस्थापक व संचालक डॉ.ओमेन डेविड यांचे दूरदृष्टीपूर्ण नेतृत्व, प्राचार्य बिजॉय ओमन यांचे कुशल मार्गदर्शन, तसेच शिक्षकवर्ग व विद्यार्थ्यांचा परिश्रम, निष्ठा आणि समर्पण आहे.हॉली एंजल शाळेमध्ये यश हा केवळ योगायोग नाही, तर ती एक परंपरा आहे असे डॉ. ओमेन डेविड यांनी सांगितले.संस्थेचे अध्यक्ष, प्राचार्य आणि संपूर्ण शिक्षकवर्ग यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे आणि त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले आहे.

### इयत्ता दहावीचे 2025 चे गुणवंत विद्यार्थी

- श्रेयस गावस – 98.20%
- सिद्धी चौधरी – 97.20%
- * युविका सामंत – 97.20%
- * पार्थ कदम – 96.80%

भूमिहिन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजनेंतर्गत

# जमीन विक्रीस इच्छुक असणा-या जमीन मालकांना अर्ज करावयाचे आवाहन

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/
रायगड : भूमिहीन दारिद्र्यरेषेखालील आदिवासींचे सबळीकरण व स्वाभिमान योजने अंतर्गत दारिद्र्य रेषेखालील भूमिहिन आदिवासी कुटूंबाना ४ एकर जिरायती (कोरडवाहू) किंवा २ एकर बागायती (ओलिताखालील) जमीन देणेबाबत प्रस्तावित आहे. त्याचप्रमाणे शासन निर्णयानुसार जमीन विक्रीसाठी इच्छुक जमीन मालकांने खालील प्रमाणे कागदपत्रे सादर करावेत.

अर्जदाराचा जमिन विक्री करणारा/जमीन मालक विहित नमुन्यातील अर्ज, शेतजमिनीवर कोणताही बोजा नसल्याबाबत संबंधित तलाठी यांचे प्रमाणपत्र व ७/१२ उतारा संबंधित परिसरातील प्राथमिक सहकारी कृषी पतपुरवठा सेवा सोसायटीची कुठल्याही प्रकारची थकबाकी नसल्याबाबत प्रमाणपत्र, प्रस्तावित विक्रीच्या शेतजमिनीचे क्षेत्रफळ बरोबर असल्याचा मोजणी विभागाचे टाचण व नकाशासह अहवाल, जिल्हा समितीपुढे सादर केलेल्या प्रस्तावातील शेतजमिन समितीने खरेदी करणे बंधनकारक असणार नाही याची शेतजमिन विक्री करणा-या शेतक-यास जाणीव असल्याबाबतचे घोषणापत्र व जमिनीच्या खरेदी प्रक्रियेमुळे कोणताही नुकसान भरपाई मागणार नसल्याबाबत व सदर जमिनीबाबत कोणत्याही न्यायालयात वाद सुरु नसल्याबाबत विक्री प्रस्तावातील जमीन कुठेही गहाण नसल्याबाबतचे संबंधित शेतजमिन विक्री करणाऱ्या जमिन मालकाचे शपथपत्र, जमिन विक्रीच्या अर्जावर शेतजमिन विक्री करणा-या व्यक्तीशिवाय कुटूंबातील दोन व्यक्तीच्या (उदा. सख्खे भाऊ, पत्नी, मुले.इ.) स्वाक्ष-या असाव्यात व त्यांचे विक्रीबाबत ना-हरकत प्रमाणपत्र.

तरी जमीन विक्रीस काढलेल्या मालकाने कागदपत्रे जोडून परिपूर्ण प्रस्ताव प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पेण, रॉयल ग्रॅन्डीअर बिल्डींग, पहिला मजला, रामवाडी-पेण जि. रायगड या कार्यालयात दिनांक ३० जुन २०२५ पर्यत कार्यालयीन वेळेत सादर करावेत.तसेच अधिक माहितीसाठी या कार्यालयाचा दुरध्वनी क्र. ०२१४३-२५२५१९ वर संपर्क करावा, असे आवाहन आत्माराम धावे,प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प ता.पेण जि. रायगड यांनी केले आहे.

# दहावीच्या परीक्षेत पां.जा. विद्यालयातील विद्यार्थ्यांची अव्वल कामगिरी

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता/ भिवंडी : महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या वतीने मार्च 2025 मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या शालांत परीक्षेचा निकाल बऱ्याच प्रतीक्षेनंतर जाहीर झाल्यावर या परीक्षेत दरवर्षीप्रमाणे मुलींनीच अव्वल गुण मिळवून, यशाची बाजी मारली असल्याचे निकालाद्वारे पुन्हा स्पष्ट झाले आहे.

त्या अनुषंगाने पालघर जिल्हा वाडा तालुक्यातील स्थापने खुर्द अशा ग्रामीण विभागातील वाडा सहकारी शिक्षण संस्थेचे पांडुरंग जावजी विद्यालय व आ.ल. चंदावरकर कनिष्ठ महाविद्यालय,वाडा मधील विद्यार्थिनी कु.पाटील तनिष्का प्रमोद हिने सेमी इंग्रजी माध्यमातून कठोर परिश्रम व सतत वाचनाने 97.40% गुण मिळवून परीक्षेमध्ये नेत्र दीपक यश मिळवले आहे, वाडा तालुक्यातून ती द्वितीय क्रमांकाने उत्तीर्ण झालेली आहे तिला विज्ञान व गणित या विषयांमध्ये विशेष रस असल्याचे तिने सांगितले.

सदर परीक्षेमध्ये विद्यालयातील तब्बल 112 विद्यार्थी डिस्टिंक्शनमध्ये आणि 113 विद्यार्थी फर्स्ट क्लास मध्ये आलेले असून, सेमी इंग्रजी माध्यमातून वाडा तालुक्यातून अनुक्रमे, प्रथम - पाटील दीपांशू भाई (97.80%), द्वितीय - पाटील तनिष्का प्रमोद (97.40%) व तृतीय - जमादार प्रतीक्षा अंबादास (97% ) क्रमांकाने उत्तीर्ण होऊन त्यांनी वाडा तालुक्यामध्ये नेत्रदीपक यश मिळवलेले आहे.

तसेच या विद्यालयातील मराठी माध्यमाच्या विद्यार्थी व विद्यार्थिनी कु. पाटील स्वरांगिनी अरुण (91.20%), गिऱ्हे नूतन संतोष (89.60%) व कु.कराळे प्रमोद महेंद्र (89.60%) गुण प्राप्त करून त्यांनीही दहावीच्या शालांत परीक्षेमध्ये यश मिळवलेले आहे.

पां. जा. विद्यालय वाडा व आ.ल.चंदावरकर कनिष्ठ महाविद्यालय,वाडा यांच्या सदर विद्यार्थ्यांनी यंदाच्या दहावीच्या शालांत परीक्षेमध्ये नेत्रदीपक यश मिळविल्याबद्दल त्यांचे मार्गदर्शक मुख्याध्यापक, शिक्षकवृंद व वाड्यातील मान्यवर व्यक्तींनी त्यांचे अभिनंदन करीत त्यांच्या भविष्यातील शैक्षणिक क्षेत्रातील वाटचालीकरिता शुभेच्छाही व्यक्त केल्या आहेत.




## छत्रपती संभाजी महाराज जयंतीदिनी नवी मुंबई महापालिका मुख्यालयात अभिवादन

छत्रपती संभाजी महाराज जयंतीदिनाचे औचित्य साधून नवी मुंबई महानगरपालिकेच्या वतीने महापालिका मुख्यालयात ॲम्फिथिएटर येथे छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पमालिका अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य लेखा व वित्त अधिकारी श्री. सत्यवान उबाळे, महापालिका सचिव श्रीम.चित्रा बाविस्कर तसेच अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गीतासार



### अध्याय ११
### विश्वरूपदर्शनयोगः

पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा । बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ११-६ ॥

हे भारता (अर्थात भरतवंशी अर्जुना), माझ्यामध्ये अदितीच्या बारा पुत्रांना, आठ वसूंना, अकरा रुद्रांना, दोन्ही अश्विनीकुमारांना आणि एकोणपन्नास मरुद्गणांना पाहा. तसेच आणखीही पुष्कळशी यापूर्वी न पाहिलेली आश्चर्यकारक रूपे पाहा. ॥ ११-६ ॥

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् । मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ११-७ ॥

हे अर्जुना, आता या माझ्या शरीरात एकत्रित असलेले चराचरासह संपूर्ण जग पाहा. तसेच इतरही जे काही तुला पाहण्याची इच्छा असेल, ते पाहा. ॥ ११-७ ॥

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा । दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ ११-८ ॥

परंतु मला तू या तुझ्या चर्मचक्षूंनी खात्रीने पाहू शकणार नाहीस, म्हणून मी तुला दिव्य दृष्टी देतो. तिच्या सहाय्याने तू माझी ईश्वरी योगशक्ती पाहा. ॥ ११-८ ॥

सञ्जय उवाच एवमुक्त्वा ततो राजन्महायोगेश्वरो हरिः । दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ११-९ ॥

संजय म्हणाले, हे महाराज, महायोगेश्वर आणि सर्व पापांचा नाश करणाऱ्या भगवंतांनी (अर्थात श्रीकृष्णांनी) असे सांगून मग पार्थाला (अर्थात पृथापुत्र अर्जुनाला) परम ऐश्वर्ययुक्त दिव्य स्वरूप दाखविले. ॥ ११-९ ॥

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् । अनेक दिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ ११-१० ॥ दिव्यमाल्याम्बरधरं दिव्यगन्धानुलेपनम् । सर्वाश्चर्यमयं देवमनन्तं विश्वतोमुखम् ॥ ११-११ ॥

अनेक तोंडे व डोळे असलेल्या, अनेक आश्चर्यकारक दर्शने असलेल्या, पुष्कळशा दिव्य अलंकारांनी विभूषित आणि पुष्कळशी दिव्य शस्त्रे हातात घेतलेल्या, दिव्य माळा आणि वस्त्रे धारण केलेल्या, तसेच दिव्य गंधाने विभूषित, सर्व प्रकारच्या आश्चर्यांनी युक्त, अनंतस्वरूप, सर्व बाजूंना तोंडे असलेल्या विराटस्वरूप परमदेव परमेश्वराला अर्जुनाने पाहिले. ॥ ११-१०, ११-११ ॥

## रेसिपी

### काश्मीरी राजमा

साहित्य : राजमा - दीड कप, बारीक चिरलेला कांदा - 1, हिरवी मिरची - 1 , हिंग - पाव चमचा
जिरा - 1 चमचा, आले पेस्ट - 1 चमचा , काश्मीरी मिरची पावडर - 1 चमचा , धणे पावडर - 2 चमचे
काश्मीरी गरम मसाला - 1 चमचा , दही - अर्धा कप , मीठ , तेल , खडा मसाला - (काळी मिरी, लवंग, दालचिनीस वेलची)

कृती : रात्रभर राजमा भिजत घाला आणि सकाळी कुकरच्या 2 ते 3 शिट्या करून राजमा शिजवून घ्या.यानंतर शिजवलेल्या राजम्यातून पाणी वेगळे करून घ्या.यानंतर एका कढईत तेल गरम करा. तेल गरम होताच हिंग आणि जिरा त्यात टाका.यानंतर बारीक चिरलेला कांदा त्यात मिक्स करा. कांदा गुलाबी रंगाचा होईपर्यंत परतून घ्या.कांदा गुलाबी रंगाचा झाल्यावर त्यात आल्याची पेस्ट, फेटलेले दही मिक्स करा.गॅसची आच मंद करून मिश्रण सतत ढवळत राहा.मिश्रणाला तेल सुटायला लागल्यावर काश्मीरी मिरची पावडर, हिरवी मिरची, राजमा मिक्स करा.सर्व मसाले एकजीव झाल्यावर त्यात मीठ टाका आणि पुन्हा परतून घ्या.यानंतर मिश्रणात दिड कप पाणी टाका आणि उकळी आणा.20 ते 22 मिनिटे मिश्रण शिजवून घ्या.ग्रेवी घट्टसर होण्यास सुरूवात झाल्यावर त्यात धणे पावडर आणि गरम मसाला टाकून एकजीव करा.
सर्वात शेवटी चिरलेली कोथिंबीर टाकून मदर्स डे स्पेशल काश्मीरी राजमा आईला रोटीसोबत सर्व्ह करा.

news.thanejeevandeep@gmail.com
दैनिक ठाणे जीवनदीप
WhatsApp Channels
महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता
मुंबई • नवी मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक : रवींद्र नारायण घोडविंदे
कार्यकारी संपादिका : डॉ. प्रतिक्षा रवींद्र घोडविंदे (एम. डी.)
9619188558 / 9082664781
www.jeevandeepvarta.com/
आपलं हक्काचं दैनिक, दररोज वाचा.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
सौ.कमलताई किसन कथोरे कॉलेज, म्हसा मुंबई विद्यापीठाशी संलग्न
ADMISSION OPEN 2025-26
११ वी व १२ वी
ARTS, COMMERCE, SCIENCE
UNDER GRADUATE: B.A., B.Com., B.Sc. CHEMISTRY, B.Sc. MATHS, BAF, BMS
POST GRADUATE: M.Sc. CHEMISTRY, M.Com. ADVANCED ACCOUNTANCY, M.A. MARATHI, M.A. ECONOMICS, M.A. SOCIOLOGY, M.A. HISTORY
Look forward to a BRIGHTER FUTURE
7038658191
9130580111

# मिरा भाईंदर मनपा शाळांना दहावी बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**भिवंडी :** मिरा भाईंदर महानगरपालिका शाळांमधील दहावीच्या विद्यार्थ्यांनी यंदाच्या बोर्डाच्या परीक्षेत अत्यंत उल्लेखनीय कामगिरी करत घवघवीत यश मिळवत, महापालिकेच्या शाळेतील निकालाचा टक्का ९०.४५% इतका लागला आहे. यंदा एकूण २४१ विद्यार्थ्यांनी परीक्षा दिली असून त्यापैकी २१८ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. हे यश शाळेतील गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिक्षकांचे परिश्रम आणि विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे फलित आहे.

या यशामध्ये विशेष उल्लेखनीय कामगिरी शाळा क्रमांक ०४ मधील कुमारी प्रीती गायकवाड हिने केली असून तिने सर्वाधिक ८५% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला आहे. त्याच शाळेतील कुमारी निर्मला प्रजापती हिने ८३.८०% गुण मिळवत द्वितीय क्रमांक पटकावला आहे. तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या विद्यार्थिनींमध्ये शाळा क्रमांक ०३ मधील कुमारी ज्योती शिरसाट आणि शाळा क्रमांक ०४ मधील कुमारी भाग्यश्री बंडे यांचा



समावेश असून त्यांनी अनुक्रमे ८२% गुण मिळवले आहेत. या विद्यार्थिनींच्या उत्कृष्ट कामगिरीमुळे इतर विद्यार्थ्यांसाठीही प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले आहे. त्यांचे आणि त्यांच्या शिक्षकांचे महापालिका शिक्षण विभागाच्यावतीने मनःपूर्वक अभिनंदन करण्यात येत आहे. मागील वर्षी निकालाचा टक्का ६५% होता, तर यावर्षी तो ९०.४५% इतका झाल्याने निकालात लक्षणीय वाढ झाली असून, ही महापालिका शाळांच्या गुणवत्तापूर्ण प्रगतीची स्पष्ट साक्ष आहे.

मिरा भाईंदर महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक राधाबीनोद शर्मा यांनी सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे व त्यांच्या पालकांचे अभिनंदन केले असून, त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. त्यांनी आपल्या प्रतिक्रियेत सांगितले की, "ही यशोगाथा शिक्षकांच्या परिश्रमांची आणि विद्यार्थ्यांच्या मेहनतीची आहे. महापालिका शिक्षण विभाग विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने नवे उपक्रम राबवत आहे." मनपा शाळांमध्ये नियमितपणे विविध कला व क्रीडा स्पर्धा घेतल्या जातात. तसेच, बोर्ड परीक्षा व इतर राज्यस्तरीय शैक्षणिक स्पर्धांसाठी विद्यार्थ्यांना प्रशिक्षण व मार्गदर्शन दिले जाते. पालिकेच्या ३६ शाळांतील एकूण ९७ वर्ग डिजिटल करण्यात आले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून दर्जेदार शिक्षण मिळते आहे. शिक्षक वर्ग विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासावर विशेष भर देत असून, विशेष शिक्षण सत्र, वैयक्तिक मार्गदर्शन अशा माध्यमातून विद्यार्थ्यांना सशक्त केले जात आहे.

यावर्षी राबविण्यात आलेल्या पालकत्व उपक्रमास विशेष यश प्राप्त झाले असून, या उपक्रमांतर्गत प्रत्येक शिक्षकाला ८ ते १० विद्यार्थ्यांचे पालकत्व देण्यात आले होते. यामुळे विद्यार्थ्यांना वैयक्तिक मार्गदर्शन मिळून त्यांच्या अभ्यासात लक्षणीय प्रगती दिसून आली. हा निकाल आणि यामागील प्रयत्न हे दर्शवतात की, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण क्षेत्रात सातत्याने प्रगती करत असून विद्यार्थ्यांना केवळ उत्तीर्णच नव्हे तर सक्षम, सुजाण नागरिक बनवण्याच्या दिशेने भक्कम पावले उचलत आहे.

# रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करण्यासाठी कौशल्य विकास विभागाचे नवे पीपीपी धोरण

## महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) धोरणात्मक भागीदार असणार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** महाराष्ट्रातील औद्योगिक प्रशिक्षण संस्थांना (आयटीआय) जागतिक दर्जाच्या प्रशिक्षण संस्थांमध्ये रूपांतरित करून उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक प्रशिक्षित मनुष्यबळ तयार करण्याच्या उद्देशाने कौशल्य, रोजगार आणि नाविन्यता विभागाने तयार केलेल्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी धोरणाला आज राज्य मंत्रिमंडळाने मंजुरी दिली. या धोरणामुळे अत्याधुनिक तंत्रज्ञान प्रशिक्षण, संस्थेतील पायाभूत सुविधा, जागतिक दर्जाच्या कंपन्यांमध्ये थेट उमेदवारी प्रशिक्षण आणि कंपन्यांच्या भागीदारीमुळे प्रशिक्षणार्थींना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणाऱ्या रोजगाराच्या जागतिक संधी उपलब्ध होणार आहेत. सदर धोरणामार्फत काळानुरूप, नावीन्यपूर्ण अभ्यासक्रम शिकवले जातील आणि २ लाख आयटीआय विद्यार्थ्यांना त्याचा लाभ होईल असे कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री श्री मंगल प्रभात लोढा यांनी मंत्रालयात वार्ताहर कक्षात पत्रकारांशी संवाद साधताना सांगितले. यावेळी अपर मुख्य सचिव मनीषा वर्मा देखील उपस्थित होत्या.

शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) ह्या राज्याच्या व्यवसायिक शिक्षण प्रणालीचा अविभाज्य भाग राहिल्या आहेत. या संस्थांना आता खऱ्या अर्थाने जागतिक औद्योगिक प्रशिक्षणाचे केंद्र बनवून महाराष्ट्रात कुशल मनुष्यबळ तयार करण्यासाठी सार्वजनिक खाजगी भागीदारी अर्थात पीपीपी धोरणाची गरज असल्याचे कौशल्य, रोजगार आणि नाविन्यता विभागाचे मंत्री श्री. मंगलप्रभात लोढा यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर स्पष्ट केले. महाराष्ट्राच्या औद्योगिक विकासात आयटीआयने कुशल मनुष्यबळ पुरवून आतापर्यंत मोठे योगदान दिले आहे. मात्र आता जागतिक उद्योगांच्या गरजेनुसार अत्याधुनिक प्रशिक्षित उमेदवारांची नितांत गरज भासू लागली आहे. अनेक संस्थांच्या पायाभूत सुविधांचा प्रश्न आहे. तसेच काही अभ्यासक्रमात त्रुटी आहेत. आर्थिक मर्यादा यासारख्या आव्हानांचा सामना या संस्थांना करावा लागत असून या संस्थांना पुनर्जीवित करून भविष्यातील गरजा ओळखून कुशल मनुष्यबळ तयार करणे आवश्यक आहे.

### असे असेल पीपीपी धोरण

अग्रगण्य कॉर्पोरेट्स, औद्योगिक संघटना, परोपकारी व्यक्तींना अभ्यासक्रम विकसित करण्यासाठी, अत्याधुनिक जागतिक प्रशिक्षण सुविधा प्रदान करण्यासाठी प्रोत्साहित केले जाईल. तसेच उद्योगांना कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (CSR) द्वारे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत सहभाग वाढवला जाईल.

1. १० वर्षे (किमान १० कोटी रुपये) आणि २० वर्षे (किमान २० कोटी रुपये )

2. या धोरणाच्या अंमलबजावणीसाठी महाराष्ट्र इन्स्टिट्यूट फॉर ट्रान्सफॉर्मेशन (मित्रा) धोरणात्मक भागीदार (स्ट्रॅटेजिक पार्टनर) म्हणून काम करणार आहे.

3. ग्रामीण भागात गरज पडल्यास निविदा काढून वायबिलिटी गॅप फंड (व्हीजीएफ) प्रणालीचा पर्याय म्हणून वापर करता येईल.

4. आयटीआयला त्यांचे स्थान, मूल्यांकन आणि संभाव्यतेच्या आधारे तीन याद्यांमध्ये विभागले जाईल.

5. आयटीआयच्या जागेची आणि इमारतीची मालकी सरकारकडे राहील.

6. आयटीआयबाबत सरकारची धोरणे कायम राहतील.

7. शिक्षक कर्मचाऱ्यांसह कर्मचारी कायम राहतील. तथापि, अतिरिक्त अभ्यासक्रमासाठी अतिरिक्त कर्मचारी भागीदार उद्योगाद्वारे नियुक्त केले जाऊ शकतात.

8. नवीन भागीदारांना उपकरणे, साहित्य खरेदी आणि नूतनीकरण / बांधकामास परवानगी दिली जाईल. सरकारी निविदा प्रक्रियेचे पालन न करता खुल्या बाजारातून ते हे करू शकतात.

9. प्रत्येक आयटीआयमध्ये एक पर्यवेक्षण समिती (आयएमसी) असेल जिथे नवीन येणारा भागीदार अध्यक्ष असेल तर सचिव आयटीआयचे प्राचार्य / उपप्राचार्य किंवा सरकारने नियुक्त केलेली व्यक्ती असेल.

# राज्यातील आठ वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**मुंबई :** राज्यातील एकूण आठ वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश जारी करण्यात आले आहेत. त्यामध्ये वरिष्ठ आयपीएस अधिकारी रविंद्र शिसवे यांची बदली राज्य गुप्तवार्ता विभागाच्या सहआयुक्तपदी करण्यात आली आहे. तर शारदा निकम यांची बदली अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्सच्या विशेष पोलिस महानिरीक्षकपदी करण्यात आली आहे. वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंह यांच्याही बदलीचे आदेश जारी करण्यात आले असून त्यांच्या पदस्थापनेचे आदेश स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहेत.

राज्यात नवीन सरकार सत्तेत आल्यापासून प्रशासनात मोठ्या





प्रमाणात बदल्यांचा धडाका सुरू झाल्याचं दिसतंय. आयएएस अधिकाऱ्यांच्या बदल्यानंतर आता आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्यांचेही आदेश देण्यात आले आहेत. सध्या राज्यातील आठ अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.

रविंद्र शिसवे हे या आधी मुंबईतील लोहमार्ग पोलिस आयुक्तपदी कार्यरत होते. त्यांची बदली आता राज्याच्या गुप्तवार्ता विभागाच्या सहआयुक्तपदी करण्यात आली आहे. तर नागपूर शहराचे पोलिस सहआयुक्त निसार तांबोळी यांची बदली ही राज्य राखीव पोलिस दलाच्या महानिरीक्षकपदी करण्यात आली आहे. अमरावतीचे पोलिस आयुक्त एन डी रेड्डी यांची बदली नागपूर शहराच्या सहआयुक्तपदी करण्यात आली आहे.

**कोणत्या अधिकाऱ्यांची कुठे बदली?**

रविंद्र शिसवे - सहआयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग

शारदा वसंत निकम -विशेष पोलिस महानिरीक्षक, अमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स

निसार तांबोळी - विशेष पोलिस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलिस दर

एन डी रेड्डी - पोलिस सहआयुक्त, नागपूर

सुप्रिया पाटील-यादव - विशेष पोलिस महानिरीक्षक, आस्थापना

राजीव जैन - विशेष पोलिस महानिरीक्षक, सागरी सुरक्षा

अभिषेक त्रिमुखे - विशेष पोलिस महानिरीक्षक, प्रशासन

वरिष्ठ आयपीएस अधिकारी आरती सिंह यांची बदली करण्यात आली असली तरी ठिकाणी अद्याप जाहीर करण्यात आलं नाही. त्यांच्या बदलीचे ठिकाण नंतर स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे.

# दृष्टीदोषावर मात करत डोंबिवलीचा शार्दुल औटी दहावीच्या परिक्षेत टिळकनगर शाळेतून प्रथम

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली :** शार्दुल संतोष औटी या विद्यार्थ्याने माध्यमिक शालांत परीक्षा मार्च २०२५ मध्ये ९७.८० टक्के गुण मिळवून टिळकनगर शाळेत प्रथम क्रमांक पटकावण्याचा मान मिळवला आहे.शार्दुल हा दिव्यांग असून वय वर्षे ३ पासून तो दृष्टीदोषाने ग्रासलेला आहे. शार्दुलची डोळ्याची दोन ऑपरेशन्स झाली असून आता त्याच्या एकाच डोळ्याला दृष्टी असूनही जिद्दीने, चिकाटीने व अथक परिश्रमाने त्याने हे यश संपादित केले आहे. दिव्यांग असूनही त्याने परीक्षेसाठी त्यासंदर्भातील कोणतीही सवलत घेतली नव्हती. शार्दुलला विज्ञान शाखेत प्रवेश घेऊन IIT संगणक अभियांत्रिकीसाठी तयारी करण्याची इच्छा आहे. त्याच्या या यशात त्याचे पालक आणि शाळेचे शिक्षक यांच्याकडून त्याला मोलाचे मार्गदर्शन लाभले. शार्दुलच्या या यशाबद्दल टिळकनगर शिक्षण प्रसारक मंडळाचे सर्व पदाधिकारी, शाळेचे पदाधिकारी, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि इतर पालकांकडून कौतुकाचा वर्षाव होत आहे.



# सरन्यायाधीश भूषण गवई न्यायालयाची विश्वासार्हता पुन्हा मिळवून देतील का? - कामगार नेते महेंद्र कुंभारे

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

सध्या देशात अराजकतेचे वातावरण आहे. जनतेचा ना सरकारवर विश्वास आहे ना व्यवस्थेवर. लोकशाहीच्या चारी स्तंभांनी कच खाल्ल्यामुळे देशातील वातावरण बिघडले आहे. व्यवस्थेने जनतेवर अन्याय केला अथवा अन्यायाची भावना उत्पन्न झाली, तर न्याय मागण्याचे एकमेव ठिकाण म्हणजे न्यायालय. जनतेच्या आशा आकांश न्यायालयाच्या विश्वासार्हतेवर टिकून आहे. मात्र, गेल्या काही वर्षापासून न्यायालयांच्या निर्णयामुळे आणि तारीख पे तारीख मुळे जनतेची न्यायालयावर असलेली विश्वासार्हता ढासळत चालली आहे. न्यायमूर्तींचे आरोपी सोबतचे फोटो, आमदाराला शिक्षा केली तर निवडणूकीवर खर्च येईल म्हणून त्याला पाठीशी घालणे आणि लोकशाहीला आव्हान असलेल्या महाराष्ट्रातील सत्तासंघर्षाचा निकाल देण्यात सरन्यायाधीशांनी केलेली चालढकल. तसेच तो निर्णय देण्यापूर्वी खुद्द पंतप्रधान सरन्यायाधीशांच्या घरी गणपती दर्शनासाठी जातात आणि त्यानंतर निकाल न देता सेवानिवृत्त होणे हे लोकशाहीला अपेक्षित नसलेली कृती सरन्यायाधीशांकडून घडणे या गोष्टी जनतेच्या पचनी न पडल्यामुळे न्यायालयाने आपली विश्वासार्हता गमवली आहे.

मात्र नुकतेच सर्वोच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीच्या पदावर न्या.भूषण गवई यांनी शपथ ग्रहण करुन कामकाजाला सुरुवात केली. पण त्याचवेळी त्यांनी सेवानिवृत्तीनंतर कोणतेच संवैधानिक पद घेणार नसल्याचे जाहीर करुन संविधानापेक्षाा या भारतात कोणीही उच्च नाही असे जाहिर केल्याने राजकारण्यांच्या पोटात गोळा आला असून जनतेच्या न्यायालयाप्रती अपेक्षा वाढल्या आहेत. याआधी तत्कालीन सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांनीही संविधानानुसारच न्यायालयाचे कामकाज चालेल असे जाहीर करुनही त्यांनी संविधान विरोधीच भूमिका घेतल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे जनतेचा विश्वासघात झाला होता. आता नवीन सरन्यायाधीश भूषण गवई यांनीही तीच री ओढली असली तरी यांच्याकडून अपेक्षा ठेवायला हरकत नाही. कारण त्यांच्या सोबतच त्यांच्या मातोश्रीचींही अतिशय महत्वाच्या विषयावर स्टेटमेंट आली असून त्यामुळे जनतेच्या आशा पल्लवीत झाल्या आहेत.

पत्रकारांनी त्यांच्या मातोश्रींना EVM बाबत प्रश्न विचारल्यावर त्यांनी निवडणूका या बॅलेट पेपरवरच घ्यायला हव्यात अशी इच्छा व्यक्त केली. त्यामुळे आईच्या इच्छेखातीर सरन्यायाधीशांनी निर्णय दिला तर पुढील राजकारणाची दिशाच बदलली जाईल. तसेच आंध्रप्रदेशच्या गुंटूर जिल्ह्यातील झोपड्या न तोडण्याच्या न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन केले म्हणून तेथील उपजिल्हाधिकाऱ्याला पदावनत करुन तहसिलदार बनवून त्याला एक लाखाचा दंडही थोपटला. शिवाय कायद्यापेक्षा कोणीही मोठा नाही मग तो कोणीही असो, असे सरन्यायाधीशांनी सूनविले. अशाप्रकारे सरन्यायाधीश भूषण गवई यांनी कायद्याची चुणूक दाखविल्याने न्यायालयाने गमावलेली विश्वासार्हता पुन्हा मिळण्याची शक्यता आहे. सरन्यायाधीश भूषण गवई यांना इतिहासात आपले नाव कोरण्याची नामी सुवर्ण संधी आली असून त्यांनी कोणत्याही दबावाला बळी न पडता संविधानाचे रक्षण करावे हिच भारतीय जनतेची इच्छा आहे!

# रिक्षाचालकाच्या तावडीतून सुटकेसाठी अल्पवयीन मुलीची धावत्या रिक्षातून उडी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता
प्रतिनिधी

**विठ्ठलवाडी :** अल्पवयीन मुलीला पळवून घेऊन निघालेल्या रिक्षाचालकाच्या तावडीतून सुटण्यासाठी या मुलीने धावत्या रिक्षातून उडी टाकून स्वतःचा बचाव केल्याची घटना भरदिवसा कल्याणच्या विठ्ठलवाडी येथे घडली. या घटनेने ठाणे जिल्ह्यात खळबळ उडाली असून विठ्ठलवाडी पोलिसांनी अनोळखी रिक्षाचालाविरुद्ध गुन्हा दाखल करून रिक्षाचालकाचा शोध सुरू केला आहे. ठाणे जिल्ह्यात यापूर्वी देखील याप्रकारच्या घटना घडल्या असून महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.


ठाणे जिल्ह्यातील उल्हासनगर येथे कुटुंबियांसह राहणारी १६ वर्षीय मुलगी रविवारी दुपारी १२ वाजण्याच्या सुमारास मोठ्या बहिणीला सांगून उल्हासनगरमधील समता नगर येथे राहणाऱ्या मावशीला भेटण्यासाठी तिच्या घरी निघाली होती. उल्हासनगरातील नेताजी नगर येथे पीडित मुलगी ही पायी चालत आली, तेथे उभ्या असलेल्या एका रिक्षाचालाकाला तिने मावशीचा पत्ता सांगून तिथे सोडण्यास सांगितले. दरम्यान रिक्षाचालकाने तीला तीला समता नगर येथे घेऊन न जाता कैलास कॉलनी येथून घेऊन निघाला होता.

पीडित मुलीने त्याला रिक्षा थांबवण्यास सांगितले. मात्र त्याने रिक्षा न थांबवत तो शिवमंदिरांच्या दिशेने सुसाट निघाला. पीडित मुलीने वारंवार त्याला रिक्षा थांबवण्यास सांगून देखील त्याने रिक्षा थांबवत नव्हता. पीडित मुलीला संशय येताच ती घाबरली आणि रिक्षाचालकाच्या तावडीतून सुटण्यासाठी तिने धावत्या रिक्षातून उडी घेऊन स्वतःची सुटका करून घेतली. मात्र रिक्षाचालकाने रिक्षा न थांबवता रिक्षा घेऊन तेथून पळून गेला. पीडित मुलगी तेथून रस्ता विचारत मावशीच्या घरी पोहचली आणि तिने मावस बहिणीला घडलेला सर्व प्रकार सांगितला. मावस बहीण तिला घेऊन रिक्षावाला याच्या विरुद्ध पोलीस ठाण्यात तक्रार देण्यासाठी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात आली व तिने तक्रार दाखल केली. पीडित मुलीने दिलेल्या वर्णनावरून पोलिसांनी अनोळखी रिक्षाचालका विरुद्ध गुन्हा दाखल केला असून त्याचा कसून शोध घेण्यात येत आहे.

# 'गाव गप्पा आणि चूल' पुस्तकाला पुरस्कार

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**डोंबिवली(वार्ताहर)-** येथील लेखिका सौ. सई जयंत बने यांच्या गाव गप्पा आणि चूल या पुस्तकाला काव्यप्रेमी शिक्षक मंच, महाराष्ट्र यांच्यातर्फे सौ. सुंदर बोंगाळे स्मृती सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार मिळाला आहे. चिपळूण येथे झालेल्या समारंभात हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. काव्यप्रेमी शिक्षक मंच, महाराष्ट्र तर्फे आयोजित या पुरस्कारासाठी राज्यभरातून दोनशेहून अधिक पुस्तके आली होती. त्यातून गाव गप्पा आणि चूल या पुस्तकाची निवड करण्यात आली.






# जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात छत्रपती संभाजी महाराज जयंती साजरी

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे – आज, दि. 14 मे, 2025 रोजी जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय, ठाणे येथे छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमास जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. स्वाती पाटील तसेच कार्यालयातील इतर अधिकारी व कर्मचारी वृंद उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात छत्रपती संभाजी महाराजांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण व अभिवादन करून करण्यात आली. यानंतर त्यांच्या अपरिमित शौर्य, निष्ठा आणि राष्ट्रनिष्ठेला उजाळा देणारे विचार डॉ. परगे व डॉ. पाटील यांनी उपस्थितांपुढे मांडले. छत्रपती संभाजी महाराजांनी स्वराज्य रक्षणासाठी दिलेले योगदान आजही प्रेरणादायी आहे, असे ते म्हणाले.

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

https://x.com/@Jeevandeepvarta
https://www.facebook.com/jeevandeepnews
https://www.instagram.com/thane_jeevandeep
https://jeevandeepvarta.com

# खडवलीच्या भारतीय सैनिक विद्यालय आणि महाविद्यालयाचा १००% निकाल

दै. ठाणे जीवनदीप वार्ता

**खडवली :** शिवनिकेतन ट्रस्ट संचलित, भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय, खडवली (पू.) ता. कल्याण, जि. ठाणे या शाळेचा दहावी व बारावीचा निकाल 100 टक्के लागला. दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुद्धा शाळेने निकालाची उज्ज्वल परंपरा कायम ठेवली आहे. विद्यार्थी हे निवासी मिलिटरी स्कूलमध्ये शिक्षणाचा लाभ घेत असतात.


निवासी शाळेत विद्यार्थी पहाटे ५ वाजता उठून शारीरिक व्यायाम, खेळ आणि वर्षभर विविध प्रकारचे आव्हानात्मक उपक्रमात उत्साहाने सहभागी होत असतात. आई-वडिलांपासून दूर राहून आणि कोणत्याही प्रकारची खाजगी शिकवणी नाही, असे असूनही उत्तम गुणवत्ता साध्य करणे हे खरोखर कौतुकास्पद आहे. दहावीच्या



सोहम जाधव



मंत्र पाटील



केदार कळसकर



हर्ष चिटणीस

परीक्षेला शाळेतून एकूण 30 विद्यार्थी प्रविष्ट झाले होते. त्यापैकी 04 विद्यार्थी विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाले आहेत तर प्रथम श्रेणीत 19 व द्वितीय श्रेणीत 07 विद्यार्थी उत्तीर्ण झालेत.

इयत्ता दहावीत हर्ष नितीन चिटणीस 88.00 टक्के गुण मिळवून प्रथम, केदार संदीप कळसकर 85.20 टक्के गुण मिळवून द्वितीय व सोहम मनीष जाधव हा 78.80 टक्के गुण मिळवून तृतीय क्रमांक प्राप्त करून उत्तीर्ण झाले आहेत. तसेच इयत्ता बारावीचा ही निकाल 100 टक्के लागला असून शास्त्र शाखेतून मंत्र देविदास पाटील 73.17 टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांकाने उत्तीर्ण झाला आहे. शाळेतील दहावी व बारावीतील विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे.

भारतीय सैनिकी विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाचा १०० टक्के निकाल लागल्याबद्दल सर्व गुणवत्ता प्राप्त व यशस्वी यशस्वी विद्यार्थ्यांचे तसेच प्र. मुख्याध्यापक महेश भावसार, सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि वसतिगृहाचे व्यवस्थापक विजय चव्हाण, हाऊस मास्टर तसेच कर्मचारी यांचे शिवनिकेतन ट्रस्ट संस्थेचे अध्यक्ष आप्पासाहेब शिंदे, शालेय समिती अध्यक्षा राजेश्वरी शिंदे, कमांडंट निवृत्त कर्नल शंकरराव यादव यांनी कौतुक केले.



# 'फेरीवाला मुक्त' डोंबिवली स्थानक परिसराची ओळख कायम

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : डोंबिवली पश्चिमेकडील स्टेशनबाहेरील परिसर अनेक वर्षापासून फेरीवाला मुक्त परिसर नेहमीच लक्षवेधी ठरत आहे. कारण आधी फेरीवाल्यांचे पुनर्वसन आणि नंतर रेल्वे स्टेशनपासून 150 मीटर अंतर फेरीवाला मुक्त असे धोरण अनेक वर्षापासून डोंबिवली पश्चिमेला पालिका अधिकाऱ्यांनी राबविलेले आहे. सध्या त्याच प्रकारे कामाची पद्धत असल्याने फेरीवाला विषयाबाबत नागरिकांनी पालिका प्रशासन, पथकप्रमुख विजय भोईर व कर्मचारी यांचे कौतुक करत आहेत.

डोंबिवली पश्चिम स्टेशनबाहेरचा परिसर अनेक वर्षापासून फेरीवाला मुक्त आहे. काही वर्षापूर्वी स्टेशनबाहेर बसत असलेल्या फेरीवाल्यांना पूर्वीचे विष्णुनगर पोस्ट ऑफिसजवळ पूर्णवसन केले होते. स्टेशनबाहेर एकही फेरीवाला बसणार नाही याकडे 'ह' प्रभाग क्षेत्र पथकप्रमुख भोईर यांचे लक्ष असते.




नागरिकांना स्टेशनबाहेर येताना फेरीवाल्यांची अडचण होत नसल्याने प्रशासनाच्या कामावर खुश आहेत.काही वाहने वाहतकीस अडथळा निर्माण होईल अशा प्रकारे उभे करत असल्याने पालिका प्रशासनाने स्टेशन बाहेरील 150 मीटर अंतराहुन लांब पार्किंगचे बोर्ड लावले आहे. याला नागरिकांनी सहकार्य करावे असे भोईर म्हणाले.

## सर्वोदय विद्यालय मराठी माध्यम शाळेचा निकाल



प्रथम क्रमांक
पार्थ नरेश गोरपेकर : ८७.४० %



द्वितीय क्रमांक
प्रीत गणेश गोरपेकर ८३.२० %

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली(शरद शहाणे) : सर्वोदय विद्यालय निळजे शाळेतील एकूण विद्यार्थी 71. 2 विद्यार्थी परीक्षेस गैरहजर, 69 विद्यार्थी उत्तीर्ण, 12 विद्यार्थी डिस्टिंक्शन, 27 विद्यार्थी ग्रेड वन, 22 विद्यार्थी ग्रेड टू, सहा विद्यार्थी ग्रेड सी ,एकूण : 67 विद्यार्थी पास , टक्के : 97.10, पार्थ नरेश गोरपेकर 87.40%, प्रीत गणेश गोरपेकर ८३.२०% ,ऋषिकेश ज्ञानेश्वर पाटील 81.60 % अशाप्रकारे या शाळेचा निकाल लागला आहे.

# बदलापूर पालिकेकडून नालेसफाई सुरू

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

बदलापूर : शहरात मंगळवारी (ता. १३) दुपारनंतर पडलेल्या जोरदार पावसामुळे रस्त्यांना अक्षरश नद्यांचे स्वरूप प्राप्त झाले होते. अवकाळी पडलेल्या या पावसात रस्त्यांवर पाणी साचून निर्माण झालेली परिस्थिती पाहता पालिकेने यंदा चांगल्या दर्जाची नालेसफाई करण्याची गरज असल्याचे मत नागरिकांकडून व्यक्त केले जात आहे, तर पालिकेने नालेसफाईला सुरुवात केली असून, सखल भागातील नाल्यांना सफाईसाठी प्राधान्य दिल्याचे सांगण्यात आले आहे. बदलापूर शहराला प्रत्येक पावसात पुराची भीती सतावत असते. त्यात पश्चिमेला उल्हास नदीच्या काठावरील आणि नदी जवळच्या सखल भागांत साचत असलेल्या पाण्यामुळे अतिवृष्टीच्या दिवसांत शहरात पूरसदृश परिस्थिती निर्माण होते. याला शहरांमधील नाल्यांची सफाई दर्जेदार होत नसल्याचे कारण समोर येत आहे. त्याचबरोबर नाल्यात झालेले अतिक्रमण, नाल्यात भर टाकून होत



प्रातिनिधिक छायाचित्र

असलेले बांधकाम यामुळे बदलापूर शहराला पूरस्थितीचा धोका सतावत असतो. त्यात मंगळवारी अचानक आलेल्या अवकाळी पावसाचा बदलापूर शहराला चांगलाच

### अवकाळीचा नालेसफाईला फटका

फटका बसला. शहरातील रस्ते जलमय झाले होते. रस्त्यांवर पाणी साचून रस्त्यांना अक्षरशः नद्यांचे स्वरूप मिळाले होते. दरवर्षी नालेसफाई करून अनेकदा नाल्यातील गाळात रुतलेला कचरा हा नाल्यातील काठावरच टाकला जातो. पुन्हा पावसाच्या मोठ्या सरीत हा कचरा नाल्यात येऊन साचतो. त्यामुळे नालेसफाई होत असताना ही घाण नाल्याच्या काठावर न टाकता तिची योग्य विल्हेवाट लावण्याची मागणी निसर्गप्रेमींकडून केली जात आहे, तर आम्ही अनेक नाल्यांची सफाई केली आहे. ही संपूर्ण घाण आम्ही डम्पिंग ग्राउंडवर नेऊन त्याची विल्हेवाट करणार असल्याचे पालिकेच्या आरोग्य विभागाच्या अधिकारी श्रेया शिस्वटकर यांनी सांगितले.




## टिटवाळा गँगरेप प्रकरण रेस्ट हाऊस मधील सीसीटीव्ही फुटेज पोलिसांच्या ताब्यात

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता कल्याण : बल्याणीतील २१ वर्षीय तरुणीवर नशेचे इंजेक्शन आणि अंमली पदार्थ देऊन सामूहिक बलात्कार केल्याच्या गंभीर प्रकरणात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊसमध्ये देखील नेले असल्याचा आरोप पिडीतीकडून करण्यात आल्याने राज्याच्या शासकीय यंत्रणेतील धक्कादायक दुर्लक्ष समोर आलं आहे. याप्रकरणी कल्याण येथील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या रेस्ट हाऊसचे सीसीटीव्ही फुटेज तांत्रिक तपासासाठी ताब्यात घेण्यासाठी पोलीस आले असल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या आधिकारी सुत्रांकडून माहिती मिळाली असल्याने सीसीटीव्ही पुटेज तपासणी पोलीस तपासाच्या दुष्टीकोनातून महत्त्वाचा दुवा ठरणार असे चित्र यानिमित्ताने दिसत आहे.

## रवींद्रनाथ टागोर इंग्लिश स्कूलचा दहावीचा निकाल







| प्रथम क्रमांक | द्वितीय क्रमांक | तृतीय क्रमांक |
|---|---|---|
| श्रुती प्रकाश पाटील | विनित विनोद फराड | श्रीया नारायण नायक |
| ८२.२०% | ८१.००% | ८०.६०% |

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

रवींद्रनाथ टागोर न्यू इंग्लिश स्कूल निळजे इंग्रजी माध्यम शाळेचा दहावीचा निकाल 95. 31% एवढा लागला आहे. श्रुती प्रकाश पाटील या विद्यार्थिनीला 82.20% मार्क मिळाले असून शाळेत प्रथम क्रमांक,विनित विनोद फराड 81.00% द्वितीय क्रमांक, श्रीया नारायण नायक 80.60% तृतीय क्रमांक, पटकाविला.

# स्वरूप मोरेला दहावीत सर्वच विषयात ३५ गुण

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

ठाणे : "पस्तीस टक्के मिळाले, लयं भारी वाटतयं ....आता मला पोलीस व्हायचय ," अशी प्रतिक्रिया देणाऱ्या स्वरूप रविंद्र मोरे याने शैक्षणिक क्षेत्रात इतिहास रचला आहे, याची कदाचित कल्पनाही नसेल. ठाणे शहरातील सावरकर नगर येथे असलेल्या लोकमान्य नगर शिक्षण मंडळ संचलित भारतरत्न श्रीमती इंदिरा गांधी विद्यामंदिर व रा.ज. ठाकूर कनिष्ठ विद्यालयात शिक्षण घेणाऱ्या स्वरूप रविंद्र मोरे या विद्यार्थ्याने सर्वच विषयात 35



गुण घेण्याची 'कामगिरी' केली. आई वडिलांच्या आशीर्वाद आणि शिक्षकांनी केलेल्या मार्गदर्शनामुळे आपल्याला 35 टक्के गुण मिळाले असून नशीब मी नापास झालो नाही. पास झाल्यावर आई वडील म्हणतात कि बरे झाले आमचे नाव खाली नाही पाडले. अशी माहिती स्वरूप मोरे याने दिली. तसेच मी अभ्यास कमीच केला होता. भविष्यात मी क्रीडा क्षेत्रात कबड्डी, क्रिकेट यामध्ये करिअर करण्याचे सुद्धा स्वप्न पाहत आहे. नापास झालेल्या किंवा 35 टक्के गुण मिळालेल्या विद्यार्थ्यांनी खचून न जाता जसे जमते तसे प्रयत्न करा पण पेपर द्या पास व्हा. वेगळा विचार मनात आणू नका असे कमी गुण मिळवलेल्या विद्यार्थ्यांना स्वरूप ने आवाहन केले आहे.

स्वरूप मोरे यांना सर्व मित्र चिडवत होते की तू नापास होणार, तू नापास होणार पण तो पास झाला याचा सर्व मित्रांना आनंद होत आहे. असे त्याच्या मित्रांनी 35 टक्के गुण मिळवल्यानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या. यावेळी पर्यवेक्षक विनोद पाटील, कुंडलिक मांढरे सर व इतर शिक्षकांनी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना शुभेच्छा दिल्या.

**मला सर्वात जास्त आनंद होत आहे. अशी घटना माझे ३२ वर्षाचे आयुष्यामध्ये प्रथम घडली आहे. याचा मला खूप आनंद वाटतो. मोरे यांने सर्व विषयात ३५ गुण मिळवले याचा खूप अभिमान आहे. शाळेतील सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस हार्दिक शुभेच्छा. शाळेच्या निकालाची परंपरा यशस्वी असून अभिमानास्पद आहे.**

**– नरेंद्र मोरे, मुख्याध्यापक भारतरत्न श्रीमती इंदिरा गांधी विद्यामंदिर व रा.ज. ठाकूर कनिष्ठ विद्यालय, ठाणे**

## मेगा जॉब फेअरमध्ये सहाशे तरुणांना नोकरी




दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

डोंबिवली : रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट आणि ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल यांच्या माध्यमातून मेगा जॉब फेअर २०२५ उपक्रम आयोजित केला होता. या उपक्रमात मान्यताप्राप्त तेहतीस कंपन्यांनी सहभाग घेतला होता. कंपनीतील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांच्या मुलाखती घेवून त्यांना तेथेच नियुक्तीपत्र दिले. या मेगा जॉब फेअर २०२५ मध्ये सुमारे सहाशे तरुणांना नोकरी मिळाल्याने त्यांनी आयोजकांचे आभार मानले. असे उपक्रम रोटरीच्या माध्यमातून घेतले जातात अशी माहिती रोटरीचे प्रमुख डॉ. उल्हास कोल्हटकर यांनी दिली.पूर्वेकडील जीईआयज ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल येथे बुधवारी १४ मे रोजी सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत मेगा जॉब फेअर २०२५ कार्यक्रम घेण्यात आला. कार्यक्रमाचे उद्घाटन प्रमुख पाहुणे डॉ. उल्हास कोल्हटकर, रोटरी क्लब डोंबिवली ईस्ट अध्यक्ष माधव सिंग, सचिव चक्रपाणि शुक्ला, निलजा पाटील, तृप्ती तोमर आदी मान्यवरांनी दीपप्रजवलनाने केली.

या मेगा जॉब फेअर २०२५ मध्ये सुमारे ३३ प्रसिद्ध कंपन्यांच्या अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांना मार्गदर्शन करून नोकरीच्या शोधत असलेल्यांना नियुक्तीपत्र दिले.

देशातील आघाडीच्या कंपन्या आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांशी एकाच छताखाली, एकाच दिवशी आणि पूर्णपणे मोफत संवाद साधून लाभार्थ्यांना या उपक्रमात विशेष सहकार्य दिले. रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट मेगा जॉब फेअर 2025 चे हे सलग चौथे वर्ष आहे. ज ए इ चे ब्लॉसम इंटरनॅशनल स्कूल आणि रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्ट संयुक्त विद्यमाने घेण्यात आले. निलजा पाटील मुख्याध्यापिका तृप्ती तोमर उप मुख्याध्यापिका यांनी युथ एम्प्लॉयमेंट आणि लोकांच्या टॅलेंटला संधी मिळावे यासाठी हा केलेला एक प्रयत्न आहे. सक्षम आणि आत्मनिर्भर भारत बनवण्याचा दृष्टीने रोटरी क्लब डोंबिवली ईस्ट आणि डॉक्टर कोल्हटकर यांच्या सहकार्याने हा हे जॉब फेअर उपक्रम झाला.

नोकरीच्या शोधात असणाऱ्या तरुणांसाठी सदर मेगा जॉब फेअर २०२५ यशस्वी करण्यासाठी रोटरी क्लब डोंबिवली ईस्ट अध्यक्ष माधव सिंग, सचिव चक्रपाणि शुक्ला, सतीश आटकेकर, प्रकल्प प्रमुख डॉ. विनय भोळे, डॉ संदीप घरत, विनायक आगटे, राजीव प्रभुणे, चंद्रशेखर शिंदे, प्रमोद शेनवाई, राजन सावरे, आनंद हेबळी, राकेश मेहता, दिलीप यावलकर, मेघना धुल्ला, उमा सिंग यांनी विशेष मेहनत घेतली.

# माध्यमिक परीक्षेत जान्हवी काळे मुलींमध्ये अव्वल

## आई-वडिलांच्या कष्टाचे चीज केल्याने वडिलांना अभिमान

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

पेण : प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आई-वडिलांनी घेतलेल्या कष्टाचे चीज पालीतील ग.बा.वडेर हायस्कूलमधील जान्हवी सुनील काळे या विद्यार्थिनीने चमकदार कामगिरी करून दाखवली आहे. दहावीच्या परीक्षेत तब्बल ९४ % गुण प्राप्त करून विद्यालयात मुलींमध्ये प्रथम क्रमांक आणि विद्यालयात दुसरा क्रमांक मिळवण्याचा बहुमान पटकावला आहे. आपल्या लेकीने आमच्या कष्टाचे चीज सोन्यात रूपांतर करून आमच्या कुटुंबियांचे नाव उंचावून आम्हाला सुखद धक्का दिल्याचे भावनिक मत जान्हवीचे वडील सुनील काळे यांनी पुढारीशी बोलताना सांगितले आहे.

दहावीच्या परीक्षेच्या निकालात पालीतील ग.बा. वडेर हायस्कूल मध्ये दहावीच्या वर्गात शिकणाऱ्या जान्हवी सुनील काळे या विद्यार्थिनीने मुलींमध्ये चांगले गुण प्राप्त करून प्रथम क्रमांक मिळून विद्यालयाचे, तालुक्याचे



आणि कुटुंबीयांचे नाव उंचावून शैक्षणिक भरारी घेतलेली आहे. जान्हवी चे वडील हे एसटी महामंडळात मेकॅनिक म्हणून नोकरी करीत होते तर तिची आई ही गृहिणी आहे. त्यांनी आपल्या मुलीच्या पंखात बळ देऊन शिक्षण भरारी घेण्यासाठी प्रयत्न केले आहेत .तशी जान्हवीच्या घरची प्रतिकूल परिस्थिती ,या परिस्थितीची जाणीव जान्हवी काळे हिला असल्याने तिने अभ्यासात तितकीच चुणूक दाखवून दहावीच्या परीक्षेत ९४ टक्के गुण प्राप्त करून विद्यालयात दुसरा क्रमांक व मुलींमध्ये प्रथम क्रमांक मिळवण्याचा बहुमान पटकावला आहे. तिच्या या यशाने काळे कुटुंबीयांच्या आनंद गगनात मावेनासा झालेला आहे. या गुणवंत जान्हवीचे व तीच्या आई-वडिलांचे सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक वर्गातून अभिनंदन केले जात आहे. पाली गावात चणे फुटाणे विकून आपल्या कुटुंबाचे उदरनिर्वाह करणाऱ्या काळे कुटुंबियांमध्ये जान्हवी काळे हिने दहावीच्या परीक्षेत घवघवीत यश मिळवून एक प्रकारे सावित्रीची लेकच जन्माला आल्याने आई-वडिलांची कुटुंबीयांचे व शाळेची मान गौरवाने उंचावली आहे .तिच्या कुटुंबीयांनी शैक्षणिक प्रगतीसाठी अपार मेहनत घेऊन पाठबळ दिले आहे. ग.बा.वडेर विद्यालयातील तिच्या वर्ग शिक्षकांनीही तिच्यासाठी बरीच मेहनत घेऊन चांगले मार्गदर्शनही केलेले आहे. जान्हवी काळे हिने मिळवलेल्या अपूर्व यशाने विद्यालय ची मान आहे अभिमानाने उंचावली गेली आहे. तिचे विद्यालयाच्या वतीनेही अभिनंदन केले जात आहे. पालीतील सामाजिक कार्यकर्ते संजय घोसाळकर यांनी जान्हविचे अभिनंदन तिच्या घरी जाऊन करून तिच्या भावी वाटचालीला हार्दिक शुभेच्छा दिल्या आहेत. परिस्थिती नुसार माझ्या मुलीला शिक्षणात कोणतीही कसूर ठेवली नाही. हवे ते शिक्षणासाठी उपलब्ध करून दिले, त्यामुळे तिनेही आम्ही घेतलेल्या कष्टाची कदर करून दहावीच्या परीक्षेत खूप खूप यश मिळवून आमच्या कष्टाचे एक प्रकारे चीज केल्यासारखे आहे. त्यामुळे आमचे आणि आमच्या कुटुंबियांचे नाव निश्चितच उंचावले गेले गेले आहे तसेच ती विज्ञान शाखेत प्रवेश घेणार असल्याचे जान्हवीचे वडील सुनील काळे व आई भावना काळे यांनी सांगितले.

# डिव्हायडार बनलाय अपघाताचे केंद्र

## चालकाचे नियंत्रण सुटून डंपर चढला डिव्हायडरवर

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण पूर्वेकडील पूना लिंक रोड येथील विजयनगर येथे एक रेतीने भरलेला डंपर ब्रेक निकामी झाल्याने डिव्हायडरवर चढून त्याचा अपघात झाला. या अपघातात सुदैवाने कोणतीही जिवीतहानी झालेली नाही. मात्र, ही दोन महिन्यातली तिसरी घटना आहे. येथील काटे मानवली नाका ते पुना लिंक रोड, विजयनगर, तिसगाव नाका, चक्की नाका येथे मोठा उतार असल्याने अवजड वाहनांचे असे अपघात होत आहेत.

विजयनगर भागात अगदी काही दिवसांपूर्वी अशाच एका ब्रेक निकामी झालेल्या मोठ्या ट्रकने सात – आठ वाहनांना धडक दिली होती. यात तीन जण गंभीर जखमी झाले होते. अशा घटना यापूर्वीही इथे घडल्या आहेत. त्यानंतर आता पुन्हा एकदा डंपरचे ब्रेक निकामी होऊन अपघात झाल्याचा प्रकार घडला. याचे कारण, या रस्त्यावर मोठा उतार असून मोठ्या



अवजड वाहनांचे या रस्त्यावर ब्रेक दाबला तरी वाहन पुढे जात राहते. अशावेळी अनेकदा ब्रेक निकामी होण्याचा प्रकार होतो. त्यामुळे काटेमानिवली टेकडीचा हा चढ कल्याण – डोंबिवली महानगरपालिकेने कापून समतल करावा. जेणेकरून अवजड वाहनांचे अपघात होणार नाहीत. तसेच, या भागात वाहतूक पोलीस, वाहतूक नियंत्रणासाठी सिग्नल बसवले जावेत अशी मागणी माजी नगरसेवक महेश गायकवाड यांनी केली आहे.

मात्र, इथले स्थानिक नागरिक अविनाश ओंबासे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या रस्त्यावर एक दिवसाआड अशा अपघाताच्या छोट्या – मोठ्या घटना घडत आहेत. तसेच, या भागात शाळा आहेत. जर शाळा सुटल्यावर विद्यार्थी बाहेर पडताना असे अपघात झाल्यास मोठी दुर्घटना होऊ शकते असे भीती ओंबासे यांनी व्यक्त केली आहे.दरम्यान, वाहतूक पोलीस आणि कल्याण – डोंबिवली महानगरपालिकेकडे इथे ट्राफिक वॉर्डन नेमण्याची मागणी अनेक दिवसांपासून केली जात आहे. मात्र, त्यांनी आजतागायत इथे ट्राफिक वॉर्डन नेमला नसल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

# कल्याण पश्चिमेतील लाल चौकी स्मशानभुमीत उघड्यावर अंत्यसंस्कार



## पावसाळ्यापूर्वी बर्निंग स्टँन्ड परिसरात छप्पराची सुविधा होणार का?

दैनिक ठाणे जीवनदीप वार्ता

कल्याण : कल्याण डोंबिवली मनपा माजी आयुक्त यांनी स्माशनभूमी संदर्भात लक्ष देत स्माशनभूमी कामांना प्राध्यन दिले. यातुनच कोट्यवधी रुपयांची स्माशनभूमीची कामे निविदा प्रक्रिया अंतर्गत सुरू झाली. सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार कल्याण पश्चिमेतील लाल चौकी स्माशनभूमी पॅगोडा पध्दतीने बांधण्याचे काम सुमारे 1 कोटी 60 लाख रु निधीतून सुरू करण्यात आले. तात्पुरती सुविधा म्हणून स्माशनभूमी तील स्टेडियम आसन व्यवस्थे समोरील जागेत उघाड्यावर दोन बर्निंग स्टँन्ड तसेच एक वीटाचे स्टँन्ड अशी अंतिम संस्कार विधीसाठी तात्पुरती व्यवस्था करण्यात आली आहे.

मात्र छप्पराविना मृतदेहावर अंतिम अग्नी दाह विधी करण्यात येत असून नवीन स्माशनभूमी बांधण्याच्या कामाचा 180 दिवसाचा कालावधी संपून देखील फक्त फाँऊडेशनचे काम मार्गी लागले असून 15 ते 20 दिवसावर येऊन ठेवलेला पावसाळा पाहता नवीन स्माशनभूमी काम पूर्णत्वला जाणार का असा सवाल यानिमित्ताने उभा ठाकला आहे. जर पावसाळ्यात उघाड्यावर अंतिम संस्कार करण्याची वेळ आली तर मेल्यानंतर ही मरण यातना अशी

### मरणानंतर ही मरणयातना भोगाव्या लागतात

वेळ येईल. या साठी प्रशासनाने लक्ष देऊन उघाड्यावर असणाऱ्या बर्निंग स्टँन्ड परिसरात छप्पर सुविधा करावी अशी मागणी माजी नगरसेवक मोहन उगले यांनी यानिमित्ताने केली आहे.

जीवनदीप शैक्षणिक संस्था,पोई संचलित
जीवनदीप कौशल्य विकास केंद्र गोवेली
कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग संचलित
प्रवेश सुरु! प्रवेश सुरु! प्रवेश सुरु!

| | अभ्यासक्रम | कालावधी |
|---|---|---|
| १ | बांधकाम पर्यवेक्षक (कोड नं.३०४२०२) | १ वर्ष |
| २ | पॅथोलॉजी टेक्नीशियन (कोड नं.२०१२३०) | १ वर्ष |
| ३ | जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी असिस्टंट (GNMA) (कोड नं.२०१२३७) | १ वर्ष |
| ४ | डिप्लोमा कोर्स इन मेडिकल लॅब टेक्निशियन (DMLT) (कोड नं.२०१४०४) | २ वर्ष |
| ५ | सिक्युरिटी ॲण्ड फायर प्रिव्हिजन प्रशिक्षण (कोड नं.४११११२४) | ६ महिने |

पात्रता : १० वी / १२ वी / पदवी
संपर्क : जीवनदीप कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवेली, पो.रायते, ता.कल्याण, जि.ठाणे
Call : 8108559566 / 9158518832 / 9619188558

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही) (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, ९०८२६६४७८१ E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 ■ Postal Registration No. THC/256/2022-2024